निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २६९ वा.
बुधवार :०३ डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247


# निवडणूक आयुक्तांविरोधात महाभियोग आणा : नाना पटोल

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर/ प्रतिनिधी**/राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरला घेण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशानंतर राजकीय वातावरण तापले आहे. मतदान पार पडूनही निकाल २१ तारखेला जाहीर होणार असल्याने काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सरकार आणि निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही ही प्रक्रिया प्रथमच पाहत असल्याचे म्हटल्याचा उल्लेख करत,जर मुख्यमंत्रीच शंका व्यक्त करत असतील, तर राज्यघटनेच्या कलम २४३ नुसार निवडणूक आयुक्तांविरुद्ध महाभियोगच आणला पाहिजे, अशी मागणी पटोलेंनी केली.त्यांनी पुढे म्हटले की सरकार महाभियोग आणण्यास तयार नसेल तर निवडणूक आयोगाच्या मागे सरकारच आहे असे म्हणण्यास वाव आहे.

**मतमोजणी पुढे ढकलण्यावरून काँग्रेस नेत्यांची सरकारवर टीका**



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत निर्माण झालेला गोंधळ, मतदारांमधील असंतोष आणि आयोगाच्या वर्तनावर प्रश्न उपस्थित करत पटोले म्हणाले की,अशा निवडणूक आयुक्तांविरोधात महाभियोग अनिवार्य आहे. त्यासाठी विशेष अधिवेशन बोलावले पाहिजे.

**लोकशाहीचा दिवसाढवळ्या गळा घोटत आहेत**

पटोले यांनी निवडणूक आयोगावर अत्यंत कठोर शब्दांत टीका केली.

लोकशाहीचा खून केला जात आहे. जनतेमध्ये प्रचंड चिड आहे. मुख्यमंत्र्यांनी स्वतः चिंता व्यक्त केली असल्याने त्यांनी आता महाभियोग आणावा; आमचा त्यांना पाठिंबा आहे,असे ते म्हणाले.मतमोजणी अचानक पुढे ढकलल्याने संशय निर्माण झाल्याचे पटोले म्हणाले :जर उद्याच निकाल आले असते तर काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला असता. आता मात्र सर्वकाही शंकेखोर परिस्थितीत ढकलले आहे.

**'सत्तेचा माज', पैसेवाटप आणि गैरप्रकारांच्या आरोप**

या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचा आरोपही पटोलेंनी केला.अनेक ठिकाणी पैसे पकडले गेले. बूथवर पैसे वाटप झाले.शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात अशा कृत्याचे दर्शन कधी घडले नव्हते. उमेदवारांचा वाढीव निवडणूक खर्च आणि त्याबद्दलची जबाबदारी कोण घेणार, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

## सर्व नगरपरिषदा व नगरपंचायत निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरला

राज्यातील सर्व २८८ नगरपरिषद-नगरपंचायत निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी घेण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले आहेत. तसेच २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान संपल्यानंतर अर्धा तास होईपर्यंत मतदानोत्तर चाचण्यांचे (Post-poll tests) कोणतेही निष्कर्ष जाहीर करता येणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.न्यायालयाच्या या आदेशानंतर राज्य निवडणूक आयोगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना विशेष मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

**मतदान यंत्रे व गोदाम सुरक्षेबाबत कडक निर्देश**

- ईव्हीएमची हाताळणी पूर्ण सावधगिरीने करावी
- सर्व गोदामांवर २४ तास चोख सुरक्षा तैनात करावी
- प्रवेशद्वारांवरील सीसीटीव्ही, अलार्म सिस्टीम, अग्निशमन यंत्रणा नीट कार्यरत ठेवावी
- राजकीय पक्षांच्या अधिकृत प्रतिनिधींना गोदामांची सुरक्षा व्यवस्था दाखविणे बंधनकारक
- उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींना गोदामाचे प्रवेशद्वार स्पष्ट दिसेल अशा ठिकाणी बसण्याची सोय उपलब्ध करून द्यावी

**राज्यातील निवडणूक स्थिती**

२६४ नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये आज मतदान पूर्ण

सुधारित कार्यक्रमानुसार २४ नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या अध्यक्ष व सर्व सदस्य पदांसाठी आणि ७६ नगरपरिषदा/नगरपंचायतींतील १५४ जागांसाठी मतदान २० डिसेंबर २०२५ रोजी होणार या सर्व ठिकाणांची मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ सकाळी १० वाजता सुरू होणार.

**ओबीसी आरक्षणाचा गोंधळ : फडणवीसांवर टीका**

पटोले म्हणाले की, फडणवीस २४ तासांत ओबीसी आरक्षण आणून देण्याचे सांगत होते, पण आजपर्यंत काही झाले नाही.अयोग्य नियोजनामुळे काही ठिकाणी ओबीसी आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा पुढे गेले, आणि संपूर्ण प्रक्रियेचा गोंधळ सरकारनेच निर्माण केल्याचा आरोप त्यांनी केला.महाराष्ट्राचा वस्त्रहरण करण्यात आलं,असे तीव्र शब्दात त्यांनी सरकारवर निशाणा साधला.

कायदा-सुव्यवस्थेवरून सरकारवर निशाणा

राज्यातील गुन्हेगारी वाढ आणि सत्ताधाऱ्यांच्या दादागिरीवरून पटोले यांनी सरकारवर थेट आरोप केले.गुन्हेगारांना शक्ती देणं हेच सरकारचं धोरण असल्याने संतोष देशमुखांसारखी प्रकरणे घडत आहेत, असे ते म्हणाले.

## संक्षिप्त




### महाराष्ट्र 'राजभवन; झाले आता 'लोकभवन'

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी** केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार महाराष्ट्र राजभवनचे नाव आता अधिकृतपणे 'महाराष्ट्र लोकभवन' असे करण्यात आले आहे. महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी या संदर्भात राजभवन सचिवालयाला निर्देश दिले आहेत.

राजभवन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि लोक कल्याणासाठी समर्पित करण्याच्या उद्देशाने हा निर्णय दिशादर्शक आहे, असे राज्यपालांनी सांगितले.'लोकभवन' म्हणून ओळखले जाणारे राजभवन आता केवळ राज्यपालांचे निवासस्थान व कार्यालय न राहता, राज्यातील नागरिक, समाजातील विविध घटक, विद्यार्थी, संशोधक, शेतकरी आणि नागरी संघटनांशी संवाद व सहभाग यांचे एक केंद्र व्हावे, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली.

'लोकभवन' हे सरकार आणि राज्यातील जनतेमध्ये सेवा, सहकार्य व संवादाचा सेतू व्हावे, हीच या नामांतरामागची भूमिका आहे, असे त्यांनी सांगितले.'लोकभवन' केवळ संवैधानिक कर्तव्यांपुरते मर्यादित न राहता, समाजाच्या आशा, आकांक्षा आणि समस्यांप्रति संवेदनशील राहून त्यांच्याशी थेट नाते जपणारे खऱ्या अर्थाने लोकभवन असेल असे राज्यपालांनी स्पष्ट केले.

# कुंभमेळ्याचे पावित्र्य टिकवून विकासासोबत वारशाचेही जतन करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/दक्षिण गंगा असलेल्या गोदावरीच्या स्वच्छतेसाठी नागरिक आणि गुंतवणूकदारांनी दिलेला उत्स्फूर्त सहभाग अत्यंत कौतुकास्पद आहे. 'विकास भी, विरासत भी' हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संदेश मार्गदर्शक असून कुंभमेळ्याचे पावित्र्य टिकवून विकासासोबत ऐतिहासिक वारशाचेही जतन करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नॅशनल स्टॉक एक्सचेंज, मुंबई येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते नाशिक महापालिकेचा 'क्लीन गोदावरी बॉण्ड' समारंभपूर्वक सूचीबद्ध करण्यात आला. या कार्यक्रमास मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. के.एच. गोविंदराज, नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे व्यवस्थापकीय संचालक आशिष चौहान, 'मित्रा' चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, नाशिक महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाशिक परिसरात कुंभमेळ्यासाठी विविध विकासकामे होत आहेत. राज्य शासनाने नगरविकास विभागामार्फत कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक असलेली अनेक पायाभूत कामे हाती घेतली आहेत. कुंभमेळ्याचे पावित्र्य कायम राखत विकास पुढे नेला जाईल. यासाठी अनेक योजना तयार केल्या असून त्या कार्यान्वित करण्यात येत आहेत. हे करताना, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे नाविन्यपूर्ण विचार आणि वित्तीय संकल्पनेतूनच योजना पुढे जातील.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकच्या पायाभूत सुविधांच्या विकासात नाशिक महानगरपालिका महत्त्वाची भूमिका बजावत आहे. नाशिक परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासकामांची संधी उपलब्ध होत असून, ऐतिहासिक वारसा जपतानाच जीवनदायीनी गोदावरीच्या स्वच्छतेसाठी महत्त्वपूर्ण काम होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

नाशिक महानगरपालिकेला खुल्या बाजारातील गुंतवणूकदारांचा प्रचंड प्रतिसाद

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यापूर्वी पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांनीही खुल्या वित्तीय बाजारातून बॉण्डद्वारे निधी उभारला आहे.




नाशिक महानगरपालिकेच्या 'क्लीन गोदावरी बॉण्ड'ला गुंतवणूकदारांकडून सबस्क्रिप्शनसाठी मिळालेला चौपट प्रतिसाद ही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आर्थिक सक्षमता, रेटिंग आणि पारदर्शक प्रक्रियेची पावती आहे. राज्यातील १५ महानगरपालिका अशा क्षमतेच्या असून नियमन प्रक्रियेतून विशिष्ट पात्रता आणि नियामक मान्यता पूर्ण करून या महानगरपालिकाही विकासासाठी निधी उभारू शकतात.

खुल्या बाजारातून उभारलेल्या निधीच्या आधारे केंद्र सरकारकडून पायाभूत विकासासाठी मिळणाऱ्या निधीचा मार्गही सुलभ झाला आहे.तसेच 'एनएसई' प्रक्रियेमुळे २६ कोटी रुपये प्रोत्साहन निधी मिळणार असून याद्वारे महानगरपालिकेवरील व्याजभार शून्य टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतो, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

ऊर्जा क्षेत्रातील कंपन्या नॅशनल स्टॉक एक्सचेंजमध्ये सूचीबद्ध करणार

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,ऊर्जा क्षेत्रातील महत्त्वाच्या कंपन्यांच्या क्षमतेस चालना देण्यासाठी नॅशनल स्टॉक एक्सचेंजच्या माध्यमातून व्यापक प्रमाणात निधी उपलब्ध होईल. पहिल्या टप्प्यात महापारेषण (एमएसईटीसीएल), त्यानंतर महावितरण आणि महानिर्मिती या देशातील मोठ्या वीज कंपन्या सूचीबद्ध करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. या प्रक्रियेसाठी नॅशनल स्टॉक एक्सचेंजच्या अनुभवाची मोठी मदत ठरेलअसेही त्यांनी स्पष्ट केले.

# वैजापूर नगर परिषद निवडणुकीत ७३.३० टक्के मतदान

**१५,६८४ पुरुष व १५,३४६ महिला मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क**

**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर (सुयोग वाणी)**

वैजापूर नगरपरिषदेच्या १२ प्रभागांतील २३ जागा आणि नगराध्यक्षपदासाठी मंगळवारी (२ डिसेंबर) झालेल्या मतदान प्रक्रियेला मतदारांचा मोठा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण ३१,०३० मतदारांनी म्हणजेच ७३.३० टक्के मतदान नोंदवले.




मतदान सकाळी ७.३० पासून सुरू होऊन रात्री उशिरापर्यंत सुरु राहिले. काही केंद्रांवर सातनंतरही मतदानाची प्रक्रिया सुरू होती. संपूर्ण मतदान दिवसभर शांततेत पार पडल्याची माहिती निवडणूक विभागाने दिली.

शहरात ४८ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती. सुरुवातीची दोन तास मंद गतीनंतर सर्वच केंद्रांवर मतदारांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. बाजार समिती, दर्गा बेस, मौलाना आझाद शाळा, लोकमान्य टिळक शाळा यांसह अनेक केंद्रांवर रांगा दिसून आल्या.

भाजपच्या नगराध्यक्षपदाचे उमेदवार डॉ. दिनेश परदेशी व माजी नगराध्यक्षा शिल्पा परदेशी यांनी शहरातील केंद्रावर मतदान केले. शिवसेनेचे उमेदवार संजय बोरनारे यांनी मौलाना आझाद प्राथमिक शाळेत हक्क बजावला. आमदार रमेश बोरनारे, माजी आमदार भाऊसाहेब चिकटगांवकर यांसह अनेक नेते मतदान प्रक्रियेकडे लक्ष ठेवून होते.

निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड, सहाय्यक निर्णय अधिकारी भागवत बिघोत व अतिरिक्त सहाय्यक अधिकारी सुनील सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पडली.

# महाराष्ट्र सदन येथे १२ ते १४ डिसेंबर दरम्यान 'महाराष्ट्र खाद्य महोत्सव' दिल्लीकर खवय्यांसाठी मराठमोळी मेजवानी

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/प्रतिनिधी**/ महाराष्ट्राच्या खमंग खाद्य पदार्थांचा आस्वाद दिल्लीकरांना मिळावा या उद्देशाने राजधानी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात महाराष्ट्र खाद्य महोत्सवाचे आयोजन १२ ते १४ डिसेंबर २०२५ दरम्यान करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त आणि सचिव आर. विमला यांनी दिली.

कस्तुरबा मार्गावरील महाराष्ट्र सदनात आयोजित या महोत्सवात महाराष्ट्राच्या विविध प्रादेशिक खाद्यसंस्कृतीचा आणि कलेचा संगम पाहायला मिळणार आहे. चवदार पदार्थांची रेलचेल दिल्लीकरांना या निमित्ताने अनुभवायला मिळणार आहे.प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांच्या हस्ते उद्घाटन; पाककृतींची मेजवानी या खाद्य महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय शेफ विष्णू मनोहर यांच्या हस्ते होणार आहे. खाद्य महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील विविध भागांतील वैशिष्ट्यपूर्ण पदार्थ उपलब्ध असतील. नागपूर विभागातील सावजी चिकन, मटण रस्सा, तर्री पोहा आणि संत्री-आधारित मिठाई; पुणे भागातील मिसळ-पाव, वडा पाव आणि पुरणपोळी, जळगावातील शेव भाजी, वांग्याचे भरित आणि केळीशी संबंधित पदार्थ; मालवणातील मालवणी सीफूड, कोंबडी वडे आणि सोलकढी; छत्रपती संभाजी नगरमधील नान कालिया, डालिंबी उसळ आणि स्थानिक बिर्याणी; तसेच कोल्हापुरी नॉन-व्हेजमधील तांबडा रस्सा, पांढरा रस्सा आणि कोल्हापुरी चिकन किंवा मटण यांचा समावेश असेल. हे पदार्थ महाराष्ट्राच्या समृद्ध पाककृती परंपरेचे प्रतिनिधित्व करतील.या खाद्य महोत्सवात सातारा, कोल्हापूर, जळगाव,पुणे अमरावती, रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेतर्गत असलेले महिला स्वयंम सहायता समूह सहभागी होणार असून त्यांच्याकडील रुचकर पदार्थांचा देखील गरमागरम आस्वाद घेता येणार आहे.

सांस्कृतिक कार्यक्रम आणि बालकांसाठी विशेष आकर्षण

हा महोत्सव केवळ खाद्यपदार्थांपुरता मर्यादित नसून, महाराष्ट्राची समृद्ध कला आणि संस्कृती दर्शवणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.लहान मुलांसाठी खास आकर्षण म्हणून 'करमणूकीचे'चे खेळ आणि जादूचे प्रयोग याचे आयोजन करण्यात आले. ज्यामुळे कुटुंबातील सर्व सदस्यांना या महोत्सवाचा आनंद घेता येईल.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ स्टॉलद्वारे पर्यटन स्थळांचे दर्शन

या महोत्सवात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा (एमटीबीसी) विशेष माहिती



स्टॉल देखील असणार आहे.

या स्टॉलद्वारे महाराष्ट्रातील ऐतिहासिक, धार्मिक आणि नैसर्गिक पर्यटन स्थळांची माहिती देण्यात येईल. पर्यटन स्थळांच्या माहितीपत्रकांचे वितरण करून महाराष्ट्राच्या पर्यटनाला अधिकाधिक चालना देण्याचा मानस असल्याचे निवासी आयुक्त आर. विमला यांनी यावेळी सांगितले.महाराष्ट्राच्या अस्सल चवीचा संस्कृतीचा, पर्यटनाचा अनुभव घेण्यासाठी दिल्लीतील नागरिकांनी या तीन दिवसीय खाद्य महोत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी आयुक्त आर. विमला यांनी केले आहे.

# निवडणुकीचा खेळखंडोबा

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना अचानक अनिश्चिततेचे सावट पसरले आहे. नागपूर खंडपीठाने दिलेल्या आजच्या आदेशाने केवळ उद्याची मतमोजणी पुढे ढकलली नाही, तर संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. राज्यातील निवडणुका म्हणजे लोकशाहीचा आत्मा. पण या आदेशामुळे आज ही प्रक्रिया परिपक्वतेचा नव्हे, तर पोरखेळाचा नमुना बनल्यासारखी दिसत आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचा 'चुकीचा अर्थ' राजकीय हेतू? ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाचा राज्य सरकारने चुकीचा किंवा सोयीस्कर अर्थ लावला, अशी गंभीर टीका होत आहे. २७ टक्के ओबीसी आरक्षण दिल्याचे 'औचित्य' दाखवण्यासाठी सरकारने घाईने राजकीय भूमिकेला कायदेशीर रंग देण्याचा प्रयत्न केला का? हा संपूर्ण घटनाक्रम पाहता, प्रशासनाची भूमिका या निर्णयात तटस्थ नसून राजकीय निर्देशांनुसार वळण घेत असल्याचे अनेकांना जाणवत आहे.**

**मतमोजणीचा २१ डिसेंबरपर्यंत ढकललेला कार्यक्रम हा शंका वाढवणारा संकेत आहे. मतमोजणी हा निवडणूक प्रक्रियेचा कळस. मतमोजणी पुढे ढकलण्यात येणे म्हणजे संपूर्ण निवडणुकीची विश्वासार्हता ढासळण्याचे पहिले पाऊल. इतक्या मोठ्या प्रमाणात निवडणुका राज्यात याआधीही झाल्या; परंतु फक्त एका आदेशाच्या आधारे संपूर्ण प्रक्रिया एवढी अचानक थांबवली गेली, असे इतिहासात क्वचितच घडले. लोकांच्या मनात स्वाभाविकच प्रश्न निर्माण होतो, निवडणुका प्रामाणिक आहेत की 'सुटेबल' निकाल मिळवण्यासाठी वेळकाढूपणा चालू आहे? निवडणूक आयोग सरकारच्या निर्देशावर चालतेय का? स्वतःचे स्वतंत्र स्थान आणि तटस्थता जपण्याची जबाबदारी असलेल्या निवडणूक आयोगाची भूमिका सध्या सर्वाधिक वादग्रस्त ठरत आहे. आयोग सरकारच्या 'इशाऱ्यावर' काम करत असल्याचा आरोप नवीन नाही, पण आजचा निर्णय हा आरोप अधिकच बळकट करतो. निवडणूक आयोगाने पारदर्शकतेचे आणि समयबद्ध प्रक्रियेचे पालन करणे अपेक्षित होते. परंतु प्रत्यक्षात आयोग स्वतःचे अधिकारही वापरताना दिसत नाही. यामुळेच अनेकांना वाटत आहे, आयोग हा सरकारच्या हातातील बाहुले बनला आहे का?**

**विरोधकांचा आरोप स्पष्ट आहे. निकाल प्रतिकूल येणार हे लक्षात आल्यानंतर निकाल 'फिरवण्याचा' प्रयत्न तर नाही ना? हा प्रश्न केवळ विरोधकांचा नाही, तर सामान्य मतदारांच्याही मनात घुमत आहे. मतमोजणी ढकलणे म्हणजे मतचोरीकडे पहिलं पाऊल आणि मतदारांचा आवाज कुंठित करणे. लोकशाहीमध्ये निवडणूक प्रक्रिया जितकी तातडीची, तितकी पारदर्शक असणे महत्त्वाचे. राजकीय निरीक्षकांचा सरळ प्रश्न, वेळ मिळवून 'व्यवस्था' बदलण्याचा प्रयत्न होत आहे का? मतमोजणीला विलंब लावण्यामागे नेहमीच शंका निर्माण होते. जसे दबाव टाकणे, हस्तक्षेप करणे, आर्थिक वापर वाढवणे आणि निकालाला अनुकूल वातावरण तयार करणे. ही शक्यता कमी नसल्यामुळे नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे.**

**लोकशाहीचा पाया म्हणजे लोकांचा विश्वास. जेव्हा निवडणुकीसारखी पवित्र प्रक्रिया राजकीय हेतूंनी चालविली जाते, तेव्हा लोकशाही ही केवळ नावापुरती उरते. आजची परिस्थिती स्पष्टपणे सांगते. प्रशासन तटस्थ राहिले नाही, आयोग स्वायत्त राहिले नाही आणि सरकार लोकशाहीला प्रामाणिक राहिले नाही. ही फक्त निवडणुकांची संकटे नव्हे तर ही राज्यातील लोकशाही विश्वसनीयतेची मोठी परीक्षा आहे. यामुळे लोकशाहीचा गळा घोटला जातोय, लोकशाही कुठे जात आहे? निवडणुका लांबवणे, मतमोजणी रोखणे, राजकीय अर्थ लावलेले न्यायालयीन आदेश, हे सर्व लोकशाहीच्या आरोग्यास घातक आहे. निवडणूक प्रक्रियेवरचा विश्वास गमावला, तर लोकशाही केवळ औपचारिकतेची बाब उरते.**

**या संपूर्ण घटनाक्रमात सरकारवर सर्रास टीका होत असुन राजकीय हस्तक्षेपाची शंका निर्माण झाली आहे. निवडणूक प्रक्रियेत अनावश्यक हस्तक्षेप, मतमोजणी रोखणे, निवडणुका लांबवणे. या सर्व गोष्टीमुळे सरकारची भूमिका अधिकच संशयास्पद बनली आहे. जर सरकारला स्वतःच्या विजयाबाबत विश्वास असता, तर मतमोजणी पुढे ढकलण्याचे काय औचित्य? आज मतदारांचा एकच प्रश्न आहे, आमचा मतदानाचा हक्क सुरक्षित आहे का? हा प्रश्न अनुत्तरित राहू शकत नाही.**

# तपोवनातील १८०० झाडांची कत्तल म्हणजे १८ लाख लोकांचा व पशुपक्षांचा श्वास कोंडून हत्याचः सावधान!

२०२७ मध्ये नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे.त्याची जोरदार तयारी सुरू आहे. कुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्या साधू-महंतांच्या वास्तव्यासाठी तपोवनात साधूग्राम तयार केले जात आहे.त्यासाठी तब्बल १८०० वृक्षांची कत्तल केली जाणार आहे म्हणजे निसर्गाची खुली हत्या.या नाशिक मनपा प्रशासनाच्या व सरकारच्या निर्णयाचा साधू-महंतांनी कडाडून विरोध करायला हवा.कारण साधू-महंतांचे वास्तव मुख्यत्वे करून हे वृक्षांच्या सानिध्यात असते.नाशिकच्या तपोवनाचा इतिहास रामायणाशी सुध्दा जुळला आहे.याच तपोवनात भगवान राम,सीता आणि लक्ष्मण यांनी त्यांच्या १४ वर्षाच्या वनवासातील बराचसा काळ याठिकाणी घालवीला होता. त्यामुळे हे पावण स्थळ राज्यासाठीच नाही तर देशासाठी व जगासाठी ऐतिहासिक स्थळ मानल्या जाते.त्याचप्रमाणे याच स्थळी लक्ष्मणाने शूर्पणखेचे नाक कापले होते असेही सांगितले जाते. आपण रामराज्य प्रस्थापित करण्यासाठी अयोध्येत भव्य राममंदिर उभारले ही देशासाठी ऐतिहासिक आणि गौरवशाली बाब आहे.परंतु ज्या तपोवनात भगवान राम, सीता आणि लक्ष्मण यांचा सहवास होता आणि लक्ष्मणाने ज्या ठिकाणी शूर्पणखेचे नाक कापले अशा ऐतिहासिक आणि पौराणिक वास्तव्याला जर मनपा प्रशासन व सरकार १८०० वृक्ष कापून काडीमोड करून नेस्तनाबूत करीत असेल तर ही कसली रामराज्य प्रस्थापित करण्याची भाषा? तपोवनातील एक जरी वृक्ष कटत असेल तर हा मानवजातीवर,पशूपक्षांवर,निसर्गावर, पौराणिक कथांवर व देशातील जनतेच्या भावनांवर मोठा प्रहार समजल्या जाईल.आपण जेव्हा रामराज्याची कल्पना करतो तेव्हा सर्वच बाजूंचा विचार सरकारने केला पाहिजे.यात स्वतःचे स्वार्थ साधून चालणार नाही. प्रश्न रहाला साधू महंतांच्या वास्तव्याचा यासाठी अनेक पर्यायी व्यवस्था नाशिक मनपा प्रशासन व सरकार जवळ आहेत.पटांगत, ग्राउंड,शासकीय कॉटेजेस, धर्मशाळा असे अनेक पर्याय आहेत. परंतु साधू महंतांच्या वास्तव्यासाठी तपोवनातील १८०० वृक्षांची हत्या करून साधूग्राम तयार करने म्हणजे निसर्गाची खुली हत्याच म्हणावी लागेल. आज आपण पहात आहोत की,देशासह जगात बदलत्या हवामानामुळे महाप्रलय, सुनामी , अती पाऊस,अती उष्णता यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि हा संपूर्ण प्रकार जंगल कटाई व वृक्षतोडीमुळे होत ही बाब सर्वांच्या डोळ्यासमोर आहे तरीही नाशिकमधील ऐतिहासिक तपोवनातील १८०० वृक्षांची कत्तल करण्यासाठी नाशिक प्रशासन व सरकार हिरवी झेंडी देत ही अत्यंत दुर्भाग्य पुर्ण बाब आहे.ही अशी गोष्ट झाली की आ बैल मुझे मार सरकार सांगते की झाडे लावा झाडे जगवा आणि स्वतःच्या स्वार्थासाठी तब्बल १८०० झाडांची कत्तल करायची हा कुठला न्याय म्हणावा!आज एक वृक्ष लावले तर त्याला मोठे व्हायला ५ ते १० वर्षे लागतात आणि नाशिक मनपा प्रशासन व सरकार एकाच वेळेस १८०० वृक्ष कापण्याचा आदेश देत आहे ही फक्त नाशिकलाच नाही तर देशाला घातक सिद्ध होवू शकते.त्यामुळे तपोवनातील वृक्ष तोडण्याच्या पहिले सरकारने हजार वेळा विचार केला पाहिजे की १८०० वृक्षांची जर कत्तल झाली तर मानव व पशुपक्षांवर याचा किती मोठा विपरीत परिणाम होईल याची जाणीव मनपा प्रशासन व सरकार ठेवली पाहिजे. वृक्षांच्या बाबतीत हम करे सो कायदा कोन्हीही सहन करणार नाही हेही सरकारने लक्षात ठेवले पाहिजे.आज देशातील वाढते शहरीकरण व औद्योगिकरणामुळे देशातील अनेक राज्य प्रदुषणाच्या झोन आले आहे आणि आज प्रदुषणाच्या बाबतीत देशाची राजधानी दिल्ली गॅसचेंबर बनली आहे ही बाब जगजाहीर आहे. आज देशातील व राज्यातील वृक्षतोडीमुळे प्रदुषणाच्या बाबतीत भारत अत्यंत गंभीर व धोकादायक स्थितीत आहे.जगातील टॉप १०० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी ६५ शहरे एकट्या भारतातील आहेत.यात मुख्यत्वे करून दरभंगा, आसोपूर, पाटणा,नवी दिल्ली, कोलकाता, मुंबई,हैद्राबाद,बंगळूरु, चेन्नई यांचा समावेश आहे.त्यामुळे प्रदूषणाच्या बाबतीत भारताची चिंता दिवसेंदिवस वाढतच आहे. वाढत्या प्रदुषणाचे मुख्य कारण म्हणजे वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, जंगलकटाई, सांडपाणी, मोठ्या प्रमाणात वाहनांचे आवागमन, हवाई वाहतूक इत्यादींमुळे आज पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवसृष्टीला धोका निर्माण झाला असून भयभीत आहे.हा संपूर्ण प्रकार वृक्षतोडीमुळे निर्माण झाला आहे आणि आता जर तपोवनातील १८०० वृक्ष जर तोडल्या गेली तर याचा मोठा फटका नाशिककरांना भोगावा लागेल.त्यामुळे तपोवनातील एकही वृक्ष कटणार नाही याची जबाबदारी सर्वप्रथम मनपा प्रशासनने घेतली पाहिजे,मनपा प्रशासन जर आपली मनमानी करीत असेल नाशिकातील प्रत्येक नागरिकांनी या वृक्ष तोडीचा कडाडून विरोध केला पाहिजे.ही आनंदाची गोष्ट आहे की नाशिककर, निसर्गप्रेमी,समाजसेवी संघटना, अनेक राजकीय पक्ष तपोवनातील वृक्ष तोडीच्या विरोधात उभे ठाकले आहे आणि आता या आंदोलनाला मोठे बळ मिळले आहे वृक्षप्रेमी अभिनेते सयाजी शिंदे यांच्यामुळे. तपोवनातील वृक्षतोडीच्या निर्णयाला सडेतोड इशारा देवतांना सयाजी शिंदे म्हणतात की, एक जरी झाड तोडले तर १०० जणांचे बलिदान देवू.त्यामुळे सावधान नाशिक मनपा प्रशासन व सरकार वृक्ष लावने शिका व वृक्ष तोडने टाळा.आज राज्यातील प्रत्येक शहरापासून ३० किलोमीटर अंतरापर्यंत शहरीकरण झालेले आहे.यामुळे लाखोंच्या संख्येने झाडांची खुलेआम कत्तल सरकारने केली आणि याचे प्रायश्चित्त राज्याच्या जनतेला प्रदुषणाच्या माध्यमातून भोगावे लागत आहेत.त्याचप्रमाणे अनेक हिंसक पशु शहराकडे धाव घेत आहेत हा सर्व प्रकार वृक्षतोडीमुळे निर्माण झाला आहे.झाडांच्या कत्तलमुळे दिवसेंदिवस ऑक्सिजनची मात्रा कमी-कमी होत आहे याचे भान नाशिक मनपा व राज्य सरकारांने ठेवले पाहिजे.

सरकारला ग्यात आहे की करोणा काळात ऑक्सिजनसाठी किती वनवन हिंडावे लागत होते आणि आता नाशिककरांना १८०० वृक्ष मानव, पशुपक्षी व तेथील संपुर्ण जीवजंतूना शुद्ध ऑक्सिजन व हवा देण्याचे काम करीत आहेत त्यावर जर आपण कुह्राड मारत असाल तर ही वृक्षांची,मानवाची,पशुपक्षांची व जीवजंतूंची खुली हत्याच म्हणावी लागेल.त्यामुळे सावधान नाशिक मनपा प्रशासन व सरकार आपण जर चुकीचे पाऊल उचलले तर आपल्याला याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.सरकारने व नाशिक मनपा प्रशासनाने नाशिककरांच्या भावना, पौराणिक कथांचे वास्तव, निसर्गाची ढासळती परिस्थिती व बदलते हवामान या संपूर्ण बाबींचा गांभीर्याने विचार करावा व १८०० झाडांच्या कत्तलीचा निर्णय ताबडतोब मागे घ्यावा अन्यथा याचे प्रायश्चित्त भोगण्यास मनपाने व सरकारने तयार रहावे.जय हिंद.

**-लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**

# आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला बँक विलीनीकरण विचाराधीन

केंद्र सरकार पुन्हा एकदा बँकिंग क्षेत्रात मोठे बदल करण्याची तयारी करत आहे. त्या अनुषंगाने केंद्र सरकार बँक विलीनीकरणावर जोरदार भर दिल्याचं दिसून येत आहे. या संदर्भात आणखी सहा बँकांचे विलीनीकरण होण्याची शक्यता आहे. सरकार सहा मोठ्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे एकमेकांशी किंवा मोठ्या बँकेत विलीनीकरण करण्याच्या विचाराधीन आहे. सध्या ही चर्चा तीव्र झाली असून सरकार भारतात अशा मोठ्या बँका निर्माण करू इच्छिते, ज्या जगातील पहिल्या १०० बँकांमध्ये स्थान मिळवू शकतील. सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठी बँक असलेली एसबीआय भविष्यात तिचे बाजार मूल्य आणखी वाढविण्यासाठी मोठ्या बँका निर्माण करू इच्छित आहे.

सध्या, सहा सार्वजनिक क्षेत्रातील बँकांवरील निर्णय प्रलंबित असून यावर चर्चा सुरु आहे. बँक विलीनीकरणाचे मुख्य उद्दिष्ट आर्थिक बाबी मजबूत करणे, नॉन परफॉर्मिंग सेट्स (एनपीए) कमी करणे म्हणजेच अशी कर्जे किंवा आगाऊ रक्कम जी बँकेला किंवा वित्तीय संस्थेला ९० दिवसांपेक्षा जास्त काळ थकीत असल्याने उत्पन्न मिळवून देत नाहीत. सोप्या भाषेत सांगायचं झाल्यास, जेव्हा कर्जदार व्याजाची किंवा मुद्दलाची परतफेड करू शकत नाही, तेव्हा ते कर्ज 'अनुत्पादक मालमत्ता' म्हणून घोषित केले जाते. तसेच डिजिटल सेवांचा विस्तार करणे आणि जागतिक स्तरावर भारतीय बँकांची स्पर्धात्मकता मजबूत करणे हे आहे. विलीनीकरणासाठी चर्चेत असलेल्या बँकांमध्ये बँक ऑफ इंडिया, इंडियन ओव्हरसीज बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, यूको बँक आणि पंजाब न्ड सिंध बँक यांचा समावेश आहे. यापैकी काही बँका एकमेकांशी किंवा मोठ्या बँकेत विलीन होऊ शकतात.

१९९३ पासून भारतात अनेक मोठ्या बँकांचे विलीनीकरण झाले आहे. गेल्या तीन दशकांमध्ये बँकिंग व्यवस्थेत लक्षणीय बदल झाले आहेत आणि एक मोठी, मजबूत संस्था तयार करण्यासाठी अनेक बँकांचे एकत्रीकरण करण्याची रणनीति अवलंबण्यात आली आहे. अशा विलीनीकरणामुळे बँकांची भांडवली कार्यक्षमता वाढली असून चांगल्या टेक्नॉलॉजीचा वापर करणे सोपे झाले आहे. तसेच जोखीम कमी झाली आहे आणि शाखांच्या ओव्हरलॅपमुळे होणारा खर्चही कमी झाला आहे.

अलीकडील मोठ्या विलीनीकरणांबद्दल एप्रिल २०१७ मध्ये एसबीआयने तिच्या सहा सहयोगी बँकांचे विलीनीकरण केले. या बँकांमध्ये स्टेट बँक ऑफ बिकानेर न्ड जयपूर, स्टेट बँक ऑफ हैदराबाद, स्टेट बँक ऑफ पटियाला, स्टेट बँक ऑफ म्हैसूर, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर आणि भारतीय महिला बँक यांचा समावेश होता. यामुळे एसबीआय देशातील सर्वात मोठी सार्वजनिक क्षेत्रातील बँक बनली. कमी पण मजबूत सार्वजनिक क्षेत्रातील




बँका असण्याची कल्पना प्रथम माजी अर्थमंत्री अरुण जेटली यांनी सरकारमध्ये मांडली होती.

एप्रिल २०१९ मध्ये बँक ऑफ बडोदाने विजया बँक आणि देना बँक यांचे विलीनीकरण केले.

त्यानंतर बँक ऑफ बडोदा ही देशातील तिसरी सर्वात मोठी सार्वजनिक क्षेत्रातील बँक बनली. एप्रिल २०२० मध्ये पंजाब नॅशनल बँकने ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स आणि युनायटेड बँक ऑफ इंडियाचे विलीनीकरण केले. ज्यामुळे ती दुसरी सर्वात मोठी सार्वजनिक सर्व्हिस बँक बनली. त्याच वर्षी, कर्नाटकस्थित कॅनरा बँकेने सिंडिकेट बँक विलीन केली आणि देशातील चौथी सर्वात मोठी सार्वजनिक सर्व्हिस बँक बनली. युनियन बँक ऑफ इंडियाने आंध्र बँक आणि कॉर्पोरेशन बँक विलीन केली आणि पाचवी सर्वात मोठी सार्वजनिक सर्व्हिस बँक बनली.

त्यानंतर, इंडियन बँकेने अलाहाबाद बँक विलीन केली आणि सातवी सर्वात मोठी बँक बनली.

आता प्रश्न असा आहे की, पुढील विलीनीकरण कोणाचे होईल? २०१७ ते २०२० दरम्यान झालेले सर्व प्रमुख विलीनीकरण एप्रिलमध्ये आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला झाले. अर्थ मंत्रालयाने अद्याप अधिकृतपणे कोणतीही नावे जाहीर केलेली नसली, तरी एप्रिल २०२६ पर्यंत मोठी घोषणा होण्याची अपेक्षा आहे. सध्या सरकार बँकिंग विलीनीकरण योजनांचा पुढील टप्पा तयार करत आहे आणि अधिकृत डिटेल्स एप्रिल-मे मध्ये जाहीर होऊ शकते.

यावेळी पूर्वीपेक्षा मोठे विलीनीकरण एकाच वेळी होणार नाहीत; त्याऐवजी प्रोसेस सुलभ करण्यासाठी आणि भांडवल व्यवस्थापन सुधारण्यासाठी ही योजना दोन किंवा तीन टप्प्यात लागू केली जाऊ शकते.सरकारचे दीर्घकालीन ध्येय सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची संख्या १२ वरून ६-७ मजबूत आणि स्पर्धात्मक संस्थांपर्यंत कमी करणे आहे.

यामुळे बँकांचे ताळेबंद मजबूत होतील, कर्ज देण्याची क्षमता वाढेल, कामकाजात सुधारणा होईल आणि अधिक क्षमता असलेल्या बँका निर्माण होतील. विशेषतः भारताच्या वेगाने वाढणाऱ्या पायाभूत सुविधा क्षेत्राला पाठिंबा देण्यात येतील.

# चॅनेलवरील चर्चेत बदनामी केल्याप्रकरणी किशोर तिवारी यांना पाच कोटींची भरपाईची नोटीस

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई/प्रतिनिधी**/एका इंग्रजी वृत्तवाहिनीवरील चर्चे दरम्यान असत्य व बदनामीकारक वक्तव्ये करून भारतीय जनता पार्टी आणि स्वतःची प्रतिमा मलिन केल्याचा आरोप करीत भाजपाचे प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी सामाजिक कार्यकर्ते किशोर तिवारी यांना कायदेशीर नोटीस बजावली आहे. या नोटिशीत सात दिवसांच्या आत संबंधित वाहिनीवरून बिनशर्त माफी मागावी, अन्यथा पाच कोटी रुपयांची अब्रुनुकसानीची भरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

विश्वास पाठक हे भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशचे सहमुख्य प्रवक्ते असून महावितरणसह विविध सार्वजनिक वीज कंपन्यांचे स्वतंत्र संचालक म्हणूनही ते कार्यरत आहेत. १ डिसेंबर रोजी संबंधित इंग्रजी वृत्तवाहिनीवरील चर्चेत ते सहभागी झाले होते. याच चर्चेत किशोर तिवारी हे देखील पॅनेलिस्ट म्हणून उपस्थित होते.

चर्चेदरम्यान किशोर तिवारी यांनी विश्वास पाठक हे भाजपाचे प्रवक्ते नसल्याचा दावा केला. तसेच पाठक हे 'कोल माफियाचे प्रवक्ते' असल्याचा, तसेच ते भ्रष्टाचारात गुंतले असल्याचा आरोप त्यांनी केला.

याशिवाय भारतीय जनता पार्टीच्या महायुतीला 'महालूटयुती' असे संबोधत पाठक यांच्यावर ती संघटना चालविण्यात सहभागी असल्याची टीका केली. त्यामुळे भाजपाची बदनामी झाल्याचा आरोप पाठक यांच्या बाजूने करण्यात आला आहे.

२ डिसेंबर रोजी पाठक यांच्या वतीने त्यांचे वकील यांनी किशोर तिवारी यांना नोटीस पाठवली आहे.

या नोटिशीत सात दिवसांच्या आत तिवारी यांनी आपली वक्तव्ये मागे घेऊन सार्वजनिकरीत्या माफी मागावी, अन्यथा पाच कोटी रुपये नुकसानभरपाईसाठी दिवाणी दावा आणि फौजदारी खटला दाखल केला जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## अजरामर कवयत्री बहिणाबाई चौधरी

मराठी साहित्यातील अजरामर कवयत्री बहिणाबाई चौधरी यांचा आज ३ डिसेंबर रोजी ७४ वा स्मृतिदिन. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उदगारले अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. १९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्य संग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी - अहिराणी - खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर - माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण - उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेंव्हा ( मियते ) मिळते भाकर......, खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला......, मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर...... धरित्रीले दंडवत..... यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान ध्रुव तात्यासारखे अढळ आहे म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभेने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवीयत्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. आज त्यांचा ७४ वा स्मृतिदिन आहे. स्मृतिदिनी बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

# औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक पदवीधर मतदारसंघाची प्रारुप मतदार यादी जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** भारत निवडणूक आयोगाने औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघासाठी मतदार नोंदणीचा कार्यक्रम जाहीर केला असून, या कार्यक्रमानुसार ०१ नोव्हेंबर २०२५ हा अर्हता दिनांक निश्चित करण्यात आला आहे. या दिवशी पदवीधर पात्रता आणि इतर निकष पूर्ण करणाऱ्या नागरिकांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी विस्तृत नोंदणी प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

**१८ डिसेंबरपर्यंत हरकती व दावे दाखल करता येणार**

या प्रक्रियेचा पुढील टप्पा म्हणून ०३ डिसेंबर २०२५ रोजी पदवीधर मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी (Draft Electoral Roll) प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीमध्ये पात्र मतदारांची नावे, पत्ते, तसेच इतर आवश्यक तपशील समाविष्ट आहेत. प्रारूप यादी ही अंतिम नसून, पात्र नागरिकांना आपल्या नावाबाबत दावा किंवा हरकत नोंदविण्याची संधी दिली जाते.विभागीय आयुक्त तथा मतदार नोंदणी अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, प्रारूप यादीत आपले नाव योग्यरीत्या नोंदले आहे का याची खात्री करावी. जर नाव समाविष्ट नसल्यास किंवा चुकीचे असल्यास, तसेच इतर कोणत्याही तपशीलाबाबत दुरुस्ती आवश्यक असल्यास, संबंधित दावे किंवा हरकती १८ डिसेंबर २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी दाखल कराव्यात.

हरकती व दावे कोणत्या नमुन्यात दाखल करावेत?

निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या नमुन्यांमध्ये अर्ज भरून सादर करणे आवश्यक आहे :

नमुना १८ – नाव नव्याने समाविष्ट करण्यासाठी (दावा)

नमुना ७ – चुकीचे अथवा समाविष्ट नसावे असे वाटणारे नाव वगळण्यासाठी

नमुना ८ – नाव, पत्ता किंवा इतर तपशील दुरुस्त करण्यासाठी

प्रारूप मतदार यादी कुठे पाहता येईल?

**प्रारूप मतदार यादीची प्रत तपासणीसाठी खालील कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे**

विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

औरंगाबाद विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालये

सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये

सर्व तहसिल कार्यालये

नागरिकांनी जवळच्या कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन किंवा उपलब्ध असल्यास स्थानिक सूचना फलकांवर प्रदर्शित प्रत तपासून यादीतील आपला समावेश सत्यापित करावा.या प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित करताना निवडणूक विभागाने स्पष्ट केले आहे की, पदवीधर मतदारसंघातील मतदानाचा हक्क मिळवण्यासाठी यादीत नाव असणे अनिवार्य आहे. त्यामुळे पात्र मतदारांनी वेळेत जागरूकता दाखवत दावे–हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

**महाराष्ट्र शासन**

## सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर

**ई - निविदा सुचना क्रमांक (३१७) २०२५ २०२६**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर (दुरध्वनी क्रमांक – ०२४० २३३११७४) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्या कडुन छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील (०४) कामा करीता ब–१ नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑन लाईन) व्दारे मागविण्यात येत आहे.

टिप :– १) निविदा कागदपत्राचा तपशील महाराष्ट्र शासनाच्या ई–टेंडरींग संकतेत स्थळावर https://mahatenders.gov.in आणि https://pwd.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२) सदर निविदा सुचना मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल.

३) निविदा स्विकारण्यायचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर.**

**आरओसी-२०२५-२६/क्र-५/**C४३२२

दैनिक निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
दिनांक–०३/१२/२०२५

**CHANGE OF NAME**
I, AM CHANGING MY NAME FROM
**OLD NAME**
**KANCHAN DASHRATHRAO CHATE**
**TO,**
**NEW NAME**
**KANCHANKUMAR DASHRATHRAO CHATE**
AS PER MY DOCUMENTS
**ADDRESS-Plot no.84 & 85,S.no.68, Sant Tukoba Nagar, N-2 Cidco, Chhatrapati Sambhajinagar-431003**

दैनिक निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
दिनांक–०३/१२/२०२५

**CHANGE OF NAME**
I, KANCHANKUMAR DASHRATHRAO CHATE CHANGING MY SPOUSE NAME FROM
**OLD NAME**
**SUKANYA KANCHAN CHATE**
**TO,**
**NEW NAME**
**SHIVKANYA KANCHANKUMAR CHATE**
AS PER MY DOCUMENTS
**ADDRESS-Plot no.84 & 85,S.no.68, Sant Tukoba Nagar, N-2 Cidco, Chhatrapati Sambhajinagar-431003**

## ५६ व्या वाढदिवसा निमित्त ५६ वृक्षलागव

जालना /प्रतिनिधी / पर्यावरण संवर्धनाचा जागरूक संदेश देत जालना येथील वृक्षप्रेमी डॉ. विठ्ठल राजकर यांनी आपल्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त ५६ झाडांची लागवड करून अनोखा उपक्रम राबविला. वृक्षलागवड, संवर्धन आणि जनजागृती या क्षेत्रात अनेक वर्षे सातत्याने काम करणाऱ्या डॉ. राजकर यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. डॉ. राजकर यांनी गेल्या काही वर्षांत ५,३५६ झाडे लावून त्यांचे यशस्वी संवर्धन केले आहे. येत्या काळात एक लाख झाडे लावण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला असून त्याकडे ते ध्येयाने वाटचाल करत आहेत. आपल्या उपक्रमाबद्दल बोलताना डॉ. राजकर म्हणाले,

## पैठण नगरपरिषद निवडणूक: मशीन बिघाडामुळे मतदानात अडथळा, नंतर सुरळीत सुरू!

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण /प्रतिनिधी/बबन उदावंत/** शहरातील सर्व मतदान केंद्रांवर सकाळपासूनच मतदान सुरू झाले असले तरी दुपारी १२ वाजेपर्यंत मतदानाचा वेग अत्यंत संथ राहिला. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी १२ वाजेपर्यंत जवळपास सर्वच केंद्रांवर फक्त २०० ते ३५० मतदारांनी मतदान केले होते. दरम्यान, कन्या शाळा, जिल्हा परिषद शाळा, कवसाण आणि पंचायत समिती या काही केंद्रांवर मतदान यंत्रणा तांत्रिक कारणास्तव बिघडल्याचे समोर आले. या बिघाडामुळे जवळपास दीड तास मतदान प्रक्रिया पूर्णपणे थांबली. मतदारांची लांबच लांब रांग लागली होती. नंतर मशीन दुरुस्त केली गेली आणि मतदान पुन्हा सुरू झाले.



मतदारांच्या सुरळीत प्रवाहासाठी मशीनची संख्या वाढविणे, रांगा कमी करणे व प्रक्रिया अधिक सोपी करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत.सर्व मतदान केंद्रांवर अनावश्यक गर्दी होऊ नये, तसेच कायदा–सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी पोलीस प्रशासनही सतर्क आहे. सकाळपासूनच पोलीस कर्मचारी विविध केंद्रांवर गस्त घालून परिस्थितीवर लक्ष ठेवताना दिसले.दुपारनंतर मतदानाच्या वेगात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शहरातील सर्व राजकीय पक्षांनी मतदारांना मोठ्या प्रमाणावर मतदान करण्याचे आवाहन केले आहे. या वेळी एका मतदाराला तीन मतदान करावे लागणार असल्याने, प्रशासनाने मतदान पद्धतीबाबत मार्गदर्शन करणारी पोस्टर्स केंद्राबाहेर लावून माहिती देण्याची व्यवस्था केली आहे.

## नादरपूर येथे संविधान जागर अभियान सप्ताहाचे भव्य आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड / प्रतिनिधी /** कन्नड तालुक्यातील नादरपूर ग्रामपंचायत कार्यालयात सामाजिक न्याय विभागाच्या वतीने संविधान जागर अभियान सप्ताह कार्यक्रमाचे दि. १ रोजी भव्य आयोजन करण्यात आले. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ, मुख्य सचिव हर्षदीप कांबळे, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, निबंधक लोंढे साहेब व विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहेबराव रंगराव निकम होते. बार्टी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या स्वायत्त संस्थेमार्फत समता दूत सुभाष राठोड यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमांतर्गत राठोड यांनी कन्नड तालुक्यात विविध शालेय स्पर्धांचे –वक्तृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा, प्रश्नमंजुषा व भाषण स्पर्धा – आयोजन केले. संविधान दिनानिमित्त सुरू असलेल्या संविधान जागर अभियानात त्यांनी संविधानातील मूलभूत कर्तव्ये, अधिकार व मूल्यांविषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी ग्रामपंचायतीचे सरपंच–उपसरपंच, कार्यकारी मंडळाचे सदस्य, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, विद्यार्थी, अंगणवाडी सेविका–मदतनीस, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानंतर राठोड यांनी विद्यार्थ्यांना संविधान विषयक माहिती देण्यासाठी ‘सापशिडी’च्या खेळाचे आकर्षक प्रात्यक्षिक सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लक्ष्मण बळी यांनी केले, तर आभारप्रदर्शन मुख्याध्यापक नरेंद्र पाटील यांनी मानले. स्थानिक पातळीवर या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## आठवे राष्ट्रीय प्राकृतिक चिकित्सा दिनानिमित्त तीन दिवसीय कार्यशाळा व पुरस्कार वितरण उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी/** आठव्या राष्ट्रीय प्राकृतिक चिकित्सा दिनानिमित्त सूर्या फाउंडेशन, इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी (आयुष मंत्रालय, भारत सरकार) आणि नोबल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सिकंदर अली वजद मेमोरियल ट्रस्ट हॉल, भडकल गेट रोड, आयटीआय जवळ तीन दिवसीय निसर्गोपचार कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ मान्यताप्राप्त या शिबिरात शहरातील २०० हून अधिक निसर्गोपचार प्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

**निसर्गोपचाराच्या सर्वांगिण पद्धतींचे मार्गदर्शन**

कार्यशाळेत माती चिकित्सा, जलचिकित्सा, कलर थेरपी, कायरोप्रॅक्टिस, कपिंग थेरपी, मसाज थेरपी, योग, जलनेती, उपवास, एनिमा अशा विविध नैसर्गिक उपचार पद्धतींबाबत तज्ज्ञांनी सविस्तर माहिती दिली.




शिबिराचे उद्घाटन इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अनंत बिरादर यांनी केले. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक डॉ. शकील शेख (आय एन ओ मराठवाडा अध्यक्ष) आणि नोबल फाउंडेशन, औरंगाबाद यांनी कार्यवाही सांभाळली.प्रमुख मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमात माजी महापौर नंदकुमार घोडेले, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. आशा साकोळकर, आयएमएचे माजी अध्यक्ष डॉ. रमेश रोहिवाल, वैद्यकीय अधिकारी परभणी डॉ. अब्दुल मुइज खान, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. कुलदीप वाकपांजर, डायरेक्टर मोजेजा हॉस्पिटल डॉ. अब्दुल नईम खान, जॅकवन होलिस्टिक क्लिनिकचे डॉ. जकी फारुखी यांसह इतर निसर्गोपचार तज्ज्ञ उपस्थित होते.

**बेस्ट डॉक्टर अवॉर्डने सन्मान**

वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय सेवेसाठी डॉ. शगुफ्ता अन्सारी, डॉ. समीर खान, डॉ. अब्दुल नईम खान, डॉ. जकी फारुखी, डॉ. मुशीर शेख आदींचा ‘बेस्ट डॉक्टर अवॉर्ड’ प्रदान करून गौरव करण्यात आला.

**महात्मा गांधी निसर्गोपचार पुरस्कार वितरण**

कार्यक्रमात इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशनचे पदाधिकारी आणि नोबल फाउंडेशनचे स्वयंसेवक ‘महात्मा गांधी निसर्गोपचार पुरस्कार’ देऊन सन्मानित झाले. यामध्ये डॉ. सय्यद इब्राहिम, डॉ. असलम शहा, डॉ. आमिर पठाण, डॉ. रशीद शहा, डॉ. अब्दुल करीम आदींचा समावेश होता.

**डी.एन.वाय.एस. पास विद्यार्थ्यांचा गौरव**

निसर्गोपचार क्षेत्रातील डी.एन.वाय.एस. परीक्षा पास विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व मोमेंटो देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आयोजक, मार्गदर्शक डॉक्टर आणि स्वयंसेवकांनी घेतलेले परिश्रम सर्वत्र कौतुकास पात्र ठरले. हा उपक्रम निसर्गोपचाराबाबत जनजागृती आणि आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा संदेश देणारा ठरला.

## नादरपूर येथे संविधान जागर अभियान सप्ताहाचे भव्य आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय, नादरपूर येथे सामाजिक न्याय विभागाच्या वतीने दि. १ रोजी संविधान जागर अभियान सप्ताह कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ, विभागाचे मुख्य सचिव हर्षदीप कांबळे, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, निबंधक लोंढे साहेब व विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहेबराव रंगराव निकम उपस्थित होते. बार्टी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या स्वायत्त संस्थेमार्फत समतादूत सुभाष राठोड यांनी मार्गदर्शन केले.



सुभाष राठोड यांनी संविधान दिनापासून सुरू असलेल्या संविधान जागर अभियानांतर्गत कन्नड तालुक्यात वक्तृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा, प्रश्नमंजुषा व भाषण स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले. त्यांनी तरुण विद्यार्थ्यांना संविधानातील विविध मुद्दे, मूल्ये व दैनंदिन जीवनातील संविधानिक बाबींची सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमास ग्रामपंचायतीचे सरपंच,उपसरपंच,कार्यकारी मंडळाचे सदस्य,जि.प. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, विद्यार्थी,अंगणवाडी सेविका–मदतनीस,तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात शाळेतील मुलांना संविधान विषयक माहिती अधिक सोप्या पद्धतीने समजावी यासाठी राठोड यांनी ‘सापशिडी’च्या खेळाचे प्रात्यक्षिक सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लक्ष्मण बळी यांनी केले तर आभारप्रदर्शन मुख्याध्यापक नरेंद्र पाटील यांनी मानले.संविधान जागर अभियान सप्ताहाला स्थानिक पातळीवर उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

छायाचित्र : सुनिल निकम

## मराठवाड्यातील नामांकित प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर यांचा सेवागौरव समारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी/** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर यांचा सेवागौरव समारंभ शनिवारी (दि. २९) आयोजित करण्यात आला. डॉ. तेजनकर गेल्या ३६ वर्षांपासून अध्यापन आणि संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत. १९९० पासून ते महाविद्यालयात प्राध्यापक आणि मागील सहा वर्षांपासून प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत.त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात २७ फेब्रुवारी २०१८ ते ३ जून २०१९ या काळात प्र–कुलगुरू म्हणून देखील काम केले. महाविद्यालयात त्यांनी विभागप्रमुख, भूगर्भशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष, अधिसभा, विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषद सदस्य या विविध पदांवर कार्य केले असून बामुक्टो संघटनेतही सक्रिय सहभाग नोंदवला आहे.महाविद्यालयाच्या सेवेतून डॉ. तेजनकर ३० नोव्हेंबर २०२५ रोजी निवृत्त होत आहेत. कार्यक्रमाची सुरुवात मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस मा.आ. सतीश चव्हाण यांनी त्यांचा सत्कार करून केली. त्यानंतर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री. त्रिंबकराव पाथ्रीकर यांच्या हस्ते त्यांचा सेवागौरव करण्यात आला.समारंभात उपाध्यक्ष सलीम शेख, केंद्रीय



कार्यकारिणी सदस्य विवेक भोसले, डॉ. प्रकाश भांडवलदार, महाविद्यालय विकास समिती सदस्य डॉ. आदित्य येळीकर, निमंत्रित सदस्य विवेक जैस्वाल, जेष्ठ सदस्य द्वारकादास पाथ्रीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात प्राचार्य तेजनकर यांच्या कार्यकाळात विद्यार्थी कौशल्य विकास, रोजगारपूरक उपक्रम, गरजाभिमुख अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत कौतुक व्यक्त करण्यात आले. द्वारकादास पाथ्रीकर यांनी त्यांच्या मितभाषी प्रशासन कौशल्याचे कौतुक केले.

अध्यक्ष त्रिंबकराव पाथ्रीकर यांनी नमूद केले की, डॉ. तेजनकर यांच्या कार्यकाळात महाविद्यालयाने नॅक –++ ग्रेड मिळवले, पारंपरिक अभ्यासक्रम राबवणारे महाविद्यालय स्वायत्त महाविद्यालय बनले आणि अनेक व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु झाले.

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस


# संक्षिप्त

## भारतात घुसखोरी करून हक्क मागता येणार नाहीत; रोहिंग्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालय संतप्त- धनावत यांचे निवेदन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी**/भारत हे विविध धर्म-पंथीयांचे सहअस्तित्व जपणारे सार्वभौम राष्ट्र आहे. देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षा टिकवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. पण काही संघटना आणि व्यक्ती बेकायदेशीर घुसखोरांना समर्थन देत देशाच्या सुरक्षेशी तडजोड करत आहेत, असे मत ड. महेश एस. धनावत यांनी व्यक्त केले.

ते म्हणाले की,रोहिंग्यांच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच व्यक्त केलेली तीव्र नाराजी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. रोहिंग्यांच्या हद्दपारीसंबंधी दाखल वाद रिटा मनचंदा विरुद्ध भारतीय संघराज्य (W.P. Criminal No. 505/2025) या खटल्याच्या सुनावणीत मुख्य न्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्यांना कडक शब्दांत सुनावले.

न्यायालयाने थेट विचारले की,भारत सरकारने रोहिंग्यांना 'निर्वासित' घोषित करणारा कोणताही आदेश जारी केला आहे का? 'निर्वासित' ही कायदेशीर संज्ञा असून त्यासाठीची प्रक्रिया सरकारकडेच असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे बेकायदेशीरपणे सीमा ओलांडून भारतात घुसखोरी करणाऱ्यांना देशात ठेवण्याची कोणतीही कायदेशीर जबाबदारी भारतावर नाही, असा ठाम निष्कर्ष न्यायालयाने काढला.

याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी रोहिंग्यांची हद्दपारी 'कायद्याच्या प्रक्रियेनुसार' करण्याची मागणी केली असता, सरन्यायाधीशांनी तीव्र शब्दांत निरीक्षण नोंदवले:आधी तुम्ही बेकायदेशीरपणे सीमा ओलांडता, बोगदे खोदता किंवा कुंपण तोडून प्रवेश करता आणि मग म्हणता की आता भारतीय कायदे आमच्यावर लागू व्हावेत, आम्हाला अन्न, निवारा, शिक्षण मिळावे. असा कायद्याचा अर्थ लावला जाऊ शकतो का?न्यायालयाने पुढे नमूद केले की,आपल्या देशातही अनेक गरीब नागरिक आहेत. त्यांच्याऐवजी घुसखोरांवर लक्ष का द्यावे?

याचिकाकर्त्यांनी २०२० मधील सलीमुल्ला निर्णयाचा दाखला दिला असता, खंडपीठाने स्पष्ट केले की त्या निर्णयाचा गैरअर्थ लावला जात असून बेकायदेशीर घुसखोरी कोणत्याही परिस्थितीत प्रोत्साहन देण्यास न्यायालय किंवा कायदा तयार नाही.

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी मांडले की, ही याचिका प्रत्यक्ष पीडित व्यक्तीकडून नाही तर तथाकथित जनहित याचिकाकर्त्याकडून दाखल झाल्यामुळे तिच्या उद्देशावर शंका निर्माण होते. धनावत म्हणाले,सर्वोच्च न्यायालयाची ठाम भूमिका स्वागतार्ह आहे. बेकायदेशीर घुसखोरांना 'रेड कार्पेट स्वागत' देण्याऐवजी त्यांना कायद्यानुसार परत पाठवण्याची सक्ती केली पाहिजे. हेच राष्ट्राच्या सुरक्षेसाठी आणि सार्वभौमत्वासाठी आवश्यक आहे.

## महावितरणच्या मनमानी वीज बिलाला ग्राहक आयोगाचा दणका; तक्रारदारास नुकसानभरपाई

**आत्ताच एक्सप्रेस/जालना/ प्रतिनिधी**/ महावितरणने अतिरिक्त व चुकीची वीज बिले पाठवून ग्राहकाला मानसिक त्रास दिल्याबाबत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. भोकरदन तालुक्यातील तांदूळवाडी रहिवासी निर्मलाबाई भुजंगराव पाटील यांना त्यांच्या सरासरी वापराच्या ४०-४५ युनिटऐवजी जानेवारी २०२५ मध्ये २१२ युनिटचे बिल (रु. २,८४०) पाठवण्यात आले.तक्रारीच्या अनेक प्रयत्नांनंतरही महावितरणने योग्य दखल न घेतल्यामुळे त्यांनी ॲड. महेश एस. धनावत यांच्यासह ग्राहक आयोगात तक्रार नोंदवली. आयोगाने तपास केला आणि खालील निष्कर्ष काढला:-सरासरी मासिक वीज वापर ७०-१०० युनिट दरम्यान असून २१२ युनिटचे बिल अवास्तव आहे.-महावितरणने चुकीची बिले पाठवून तक्रारदारास मानसिक व शारीरिक त्रास दिला.-महावितरणने आपले दावे सिद्ध करण्यासाठी कोणताही ठोस पुरावा दिला नाही.आयोगाचे आदेश:१. जानेवारी २०२५ चे सदोष बिल आणि त्यावरील दंडव्याज रद्द करणे.२. प्रत्यक्ष वीज वापरानुसार योग्य बिल द्यावे, कोणतेही दंड/व्याज न आकारता.३. तक्रारदाराला मानसिक व शारीरिक त्रास तसेच तक्रारीच्या खर्चासाठी रु. ५,००० नुकसानभरपाई देणे.४. आदेशाची पूर्तता ४५ दिवसांच्या आत करावी.वकील ॲड. महेश एस. धनावत यांची प्रतिक्रिया हा एका सामान्य ग्राहकाचा मोठा विजय आहे. महावितरणसारख्या कंपन्यांनी ग्राहकांना त्रास देणे थांबवावे. भविष्यात ग्राहक आयोगाकडे दाद मागणे हे योग्य मार्ग आहे.

## भाजपाने उमेदवारी दिल्यास प्रभाग क्र. ०३ (अ) मध्ये प्रचंड ताकदीने निवडणूक लढवणार - ॲड. भगवान चांदोडे



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी**/ जालना महानगरपालिका निवडणूक २०२५च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्र. ०३ (अ) मध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रभागातून उच्च शिक्षित वकील, समाजसेवक आणि कार्यकर्ते ॲड. भगवान चांदोडे यांनी भारतीय जनता पक्षाकडून नगरसेवक पदासाठी उमेदवारीची इच्छा व्यक्त केली आहे. कायद्याचे सखोल ज्ञान, सामाजिक कार्याचा दांडगा अनुभव आणि प्रभागातील सक्रिय जनसंपर्क या बळावर ते जोरदार स्पर्धक ठरतील, अशी चर्चा आहे.

ॲड. चांदोडे म्हणाले,देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष मा. रविंद्र चव्हाण, लोकनेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वाखाली आणि माजी आमदार कैलासजी गोरंटयाल व भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळावी ही मनापासून इच्छा आहे. पक्षाने उमेदवारी दिल्यास प्रभाग क्रमांक ०३ (अ) मध्ये पक्षाचा झेंडा बुलंद ठेवत, जनतेच्या आशीर्वादाने प्रचंड ताकदीने रिंगणात उतरणार आहे.

ते पुढे म्हणाले की,कायद्याचे व प्रशासनाचे अनुभव वापरून प्रभागातील नागरिकांचे मूलभूत प्रश्न सोडवणे, सर्वांगीण विकास साधणे हा माझा मुख्य हेतू आहे. शिक्षण, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य, रस्ते, तसेच युवकांच्या प्रगतीसाठी असलेल्या विविध योजनांचा प्रचार-प्रसार करून अधिकाधिक सुविधा प्रभागात आणण्याचा प्रयत्न करणार आहे. ॲड. चांदोडे यांच्या सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा व सार्वजनिक क्षेत्रातील योगदानामुळे प्रभागातील नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल सकारात्मक वातावरण असून, पक्षाकडून उमेदवारी मिळाल्यास विजय मिळवण्याचा त्यांना पूर्ण आत्मविश्वास असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## पूर्वीची निर्भीड पत्रकारिता टिकवणे गरजेचे - खासदार अनिल देसाई

मुंबई (रवींद्र मालुसरे) देशाच्या स्वातंत्र्यापूर्वीपासून महाराष्ट्रात सुरू झालेली मराठी पत्रकारिता आणि तिची निर्भीडता आता लोप पावत असल्याचे खासदार अनिल देसाई यांनी व्यक्त केले. देसाई म्हणाले की, पत्रकारितेचा मुख्य उद्देश समाजाला आरसा दाखवणे आणि वस्तुस्थिती निर्भीडपणे मांडणे आहे, परंतु सध्याच्या काळात ही भूमिका फक्त ग्रामीण भागात दिसते. गोदी मीडियाचे वाढते प्रमाण ही काळाची खरी समस्या आहे.चंद्रकांत वामन पाटणकर यांच्या अमृतमहोत्सवी सोहळ्यात बोलताना देसाई यांनी सांगितले की, महाराष्ट्र हे प्रगत राज्य असून सत्य कथनाची अपेक्षा जनतेकडून असते. पाटणकर यांनी आयुष्यभर वर्तमानपत्रातून लेखन आणि समाजाचे प्रश्न मांडण्याचे कार्य केले, त्यामुळे त्यांच्या सेवाकार्याचे सन्मानपूर्वक गौरव करण्यात आला.आमदार महेश सावंत यांनी पत्रकारितेची खरी भूमिका ही सरकारला जबाबदारी दाखवणे, सामान्य माणसाची बाजू मांडणे आणि समाजप्रबोधन करणे असल्याचे सांगितले. सोशल मीडियाचा वापर करून तरुणांनी समाजातील प्रश्न मांडण्यासाठी नवनवीन माध्यमांचा उपयोग करावा, असेही त्यांनी आवाहन केले.कार्यक्रमाचे आयोजन मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, शिवसेना माहीम विभाग, दैवज्ञ समाज दादर आणि नाना शंकरशेठ प्रतिष्ठान यांनी संयुक्तपणे केले. कार्यक्रमात माजी महापौर महादेव देवळे, माजी महापौर मिलिंद वैद्य, सुरेंद्र शंकरशेट, सौ. सुहासिनी पाटणकर, जयदीप ठाकरे, तसेच अनेक ज्येष्ठ पत्रकार आणि साहित्यिक उपस्थित होते. कार्यक्रमात श्री गणेश वंदना सुप्रसिद्ध गायक अनिल पोकळे यांनी गायली आणि सूत्रसंचालन राजू पाटणकर व प्रशांत घाडीगावकर यांनी केले.

### राज्यस्तरीय शालेय योगासन क्रीडा स्पर्धा २०२५-२६ उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या आदेशान्वये जिल्हा क्रीडा परिषद छत्रपती संभाजीनगर व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय शालेय योगासन क्रीडा स्पर्धा १ ते ४ डिसेंबर २०२५ या कालावधीत विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा येथे मोठ्या उत्साहात सुरू झाली आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी १४, १७ आणि १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींचा सहभाग या स्पर्धेत आहे.

स्पर्धेचे उद्घाटन शेखर पाटील, उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करून झाले. कार्यक्रमाला जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. बाजीराव देसाई, योगा संघटनेचे सचिव राजेश पवार, महेश कुंभार, राज्य क्रीडा मार्गदर्शक रवी कुमठेकर, योगेश्वरी मिस्त्री, चंचल माळी, सुरेश मिरकर, अनिल मोहगावकर, उमेश झोटींग तसेच तालुका क्रीडा अधिकारी मुकुंद वाडकर, स्पर्धा प्रमुख गणेश पाळवदे, राज्य क्रीडा मार्गदर्शक तुषार आहेर, शिल्पा मोरे, वरिष्ठ लिपिक सदानंद सवळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा अधिकारी सुजाता गुल्हाने यांनी केले.या स्पर्धेत महाराष्ट्रातील आठही विभागांतील सुमारे ३०० ते ३५० खेळाडू, संघव्यवस्थापक व क्रीडा मार्गदर्शक सहभागी झाले आहेत. राज्य महाराष्ट्र योगा संघटनेच्या अधिकृत पंचांच्या तांत्रिक सहकार्याने स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी क्रीडा अधिकारी सुजाता गुल्हाने, खंडू यादवराव, रामकिशन मायंदे, गणेश पाळवदे, राज्य क्रीडा मार्गदर्शक

## दशकांपासूनची विजेची समस्या अखेर मार्गी



**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन (प्रतिनिधी)** छत्रपती संभाजीनगर ते माहोरा या महत्त्वाच्या बसमार्गावरील खाली लोंबकळणाऱ्या विजेच्या तारांमुळे गेली अनेक वर्षे बससेवा सुरू करण्यात अडथळे येत होते. छत्रपती संभाजीनगर परिवहन महामंडळाच्या सर्वेक्षणात मार्गावरील अनेक ठिकाणी तारांची उंची धोकादायकरीत्या कमी असल्याचे समोर आल्यानंतर हा प्रश्न गंभीर बनला होता.या परिस्थितीची दखल घेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे भोकरदन तालुका उपप्रमुख अर्जुन ठोंबरे यांनी सातत्याने पुढाकार घेत महावितरण विभागाशी पत्रव्यवहार, अधिकाऱ्यांशी चर्चा आणि प्रत्यक्ष पाठपुरावा केला. ठोंबरे यांच्या या प्रयत्नांना यश येत महावितरण विभागाने तातडीने कृती केली.

महावितरणने बसमार्गावरील विविध ठिकाणी नवीन विद्युत पोल बसवून, खाली आलेल्या विजेच्या तारांना सुरक्षित उंची दिली. आवश्यक तेथे सुधारित उंची निश्चित केल्याने बस वाहतुकीस धोका निर्माण करणारी परिस्थिती पूर्णपणे दूर झाली आहे. छत्रपती संभाजीनगर-फुलंब्री-तळेगाव दाभाडी-राजुर-केदारखेडा-जवखेडा ठों.-नळणी-बरंजळा साबळे मार्गावरील बससेनेला अडथळा ठरणाऱ्या विद्युत समस्या आता संपूर्णपणे मार्गी लागल्या. पोल उभारणीपासून तारांपर्यंतची सर्व कामे ठोंबरे यांनी स्वतः उपस्थित राहून पूर्ण केली.

अर्जुन ठोंबरे म्हणाले,स्थानिक जनतेची दशकांपासूनची प्रतीक्षा संपणार असून बससेवा सुरू झाल्यानंतर प्रवास अधिक सुरक्षित, सोयीस्कर आणि सुलभ होणार आहे. मार्ग आता पूर्णपणे भयमुक्त, अडथळामुक्त आणि बससेवेकरिता सक्षम झाला आहे.या कामांमुळे छत्रपती संभाजीनगर-माहोरा बससेवा सुरू करण्याचा मार्ग अखेर प्रशस्त झाला असून लवकरच प्रवाशांना याचा मोठा लाभ होणार आहे.

## अर्धापूर : शेतकऱ्यांच्या दुहेरी संकटाची तक्रार, बिबट्या आणि रानडुकरांचा थैमान, वनविभाग कुंभकर्णी झोपेत

**आत्ताच एक्सप्रेस**


**अर्धापूर/ प्रतिनिधी**/ तालुक्यातील अनेक गावांमध्ये मागील काही दिवसांपासून बिबट्याचे दर्शन झाल्याचे शेतकऱ्यांनी नोंदवले आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या मनात भीती पसरली असून ते स्वतःचे जीव वाचवण्यासाठी धडपड करत आहेत.


त्याचबरोबर रब्बी पिकांवर रानडुकरांचा धुमाकूळ सुरू असल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत.अर्धापूर येथील वनविभाग मात्र अद्याप कुंभकर्णी झोपेत असल्याने शेतकऱ्यांमध्ये वनविभागाबद्दल तिव्र संताप व्यक्त केला जात आहे. चोरंबा, देळूब बु, बामणी, मेंढला बु आणि मेंढला खु या परिसरातील गावांमध्ये वन्य प्राण्यांचा वावर वाढल्याची नोंद आहे. मागील आठवड्यात चोरंबा शिवारात दोन शेतकऱ्यांनी बिबट्या पाहिल्याचे सांगितले, तर याच आठवड्यात देळूब बु शिवारातही बिबट्याचे दर्शन झाले आहे. परिणामी संपूर्ण गावात भीतीचे वातावरण पसरले आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, रानडुकरांचे कळप रात्रीच्या अंधारात शेतात येऊन गहू, हरभरा, ज्वारी यांसारखी पिके मोठ्या प्रमाणात नष्ट करत आहेत.

अनेक शेतकऱ्यांच्या शेतात एका रात्रीत अर्धा ते एक एकर क्षेत्रातील पिकांची नासाडी होते. बिबट्याच्या भीतीने शेतकऱ्यांना रात्री पिकांची राखण करण्यासाठी शेतात उतरता येत नाही, ज्याचा फायदा रानडुकर घेत आहेत.

शेतकऱ्यांचा आग्रह आहे की, वनविभागाने ताबडतोब बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवावे, पिंजरे लावावे आणि रानडुकरांच्या उच्छादावर





नियंत्रण आणावे. अन्य उपाययोजना करून आमचा जीव आणि पिके वाचवावी. योग्य ती कारवाई न झाल्यास येत्या काळात पिकांचे आणखी मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची आणि एखाद्या शेतकऱ्याचा जीव जाण्याची भीती आहे. शेतकऱ्यांनी चेतावणी दिली आहे की, ह्या समस्यांवर ताबडतोब उपाय न झाल्यास पुढील कठोर पाऊल उचलावे लागेल.

## मित्रांचा जल्लोष, गुरुजनांबद्दल कृतज्ञता - २००४ बॅचची भेट अविस्मरणीय



**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री (प्रतिनिधी)** पाथ्री येथील राजश्री शाहू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता १० वी, २००४ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांची २१ वर्षांनंतर स्नेहमिलनाची संधी मिळाली. शाळेच्या दारातून पाऊल टाकताच जुन्या आठवणी आणि शिक्षकांचे मार्गदर्शन पुन्हा जिवंत झाल्याचा अनुभव सर्वांनी घेतला.दि. ३० रोजी आयोजित या कार्यक्रमाला प्राचार्य फकिरराव पुसे, उपप्राचार्य प्रल्हाद पुंगळे, तसेच शिक्षक राजेंद्र पवार, दामुआण्णा पाथ्रीकर, प्रल्हाद शिंदे, प्रभाकर खांदारे, जगन्नाथ काळे, भगवान वानखेडे, गंगाधर जिते आणि जलाल सय्यद यांची उपस्थिती लाभली.

अनेक विद्यार्थी गुरुजनांना पाहून भावूक झाले आणि सर, आपण शिकवले नसते तर आजची वाट वेगळी असती अशी कृतज्ञ भावना व्यक्त केली.

विद्यार्थ्यांमध्ये दत्ता दाभाडे, लक्ष्मण गायके, रमेश गरसोळे, माजिद पठाण, दिनेश गोरे, हिरालाल गुंजाळ, सुखदेव दाभाडे तसेच महिला विद्यार्थीनी छाया थोरात, सुनीता थोरात, प्रियंका बोडखे, यमुना काकडे, मीरा थोरात, सुमित्रा सुरडकर, अहिल्या काकडे यांनी विशेष उपस्थिती नोंदवली. सर्वांनी वर्गातील खोड्या, खेळ, पिकनिक आणि बालपणीच्या आठवणी शेअर केल्या.

या स्नेहमेळाव्यात आत्माराम काकडे, उत्तम काकडे, गजानन फरकाडे, सोमनाथ बेडके, रामदास सातपुते, नारायण काकडे, विशाल काकडे, योगेश काकडे, पंढरीनाथ भालेराव, योगेश फुके, दत्तू सुलताने यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश काकडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुखदेव दाभाडे यांनी मान्यवरांचे आभार मानून केले.

२१ वर्षांनंतर झालेल्या या स्नेहमिलनाने स्पष्ट संदेश दिला – वेळ बदलतो, आयुष्य बदलते, पण शालेय मैत्री आणि गुरुजनांचे ऋण कधीच बदलत नाही.

## खुलताबाद नगरपरिषद निवडणुकीत ८२.२६ टक्के मतदान

### शांततेत मतदान; प्रत्येक केंद्रावर चोख बंदोबस्त



**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी** / खुलताबाद नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासह नगरसेवक पदासाठीची सार्वत्रिक निवडणूक मंगळवारी (२ डिसेंबर) शहरात अत्यंत शांततेत पार पडली. शहरातील सर्व १९ मतदान केंद्रांवर चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सकाळपासूनच मतदारांची चांगली उपस्थिती पाहायला मिळाली. दिवसभर शिस्तबद्ध मतदान झाले.मात्र,प्रभाग क्रमांक ५ मधील पंचायत समिती मतदान केंद्र परिसरात अनेकवेळा किरकोळ गोंधळाचे प्रसंग उभे राहिल्याचे निदर्शनास आले.

**मतदान केंद्रांना अधिकारी व निरीक्षकांची भेट**

पंचायत समिती इमारतीतील मतदान केंद्रांना पोलीस अधीक्षक (ग्रामीण) विनयकुमार राठोड यांनी भेट देऊन सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली. तसेच निवडणूक निरीक्षक शैलेश सूर्यवंशी यांनी 'पिंक मतदान केंद्रा'ला भेट देत मतदान प्रक्रियेची माहिती घेतली.दिव्यांग, वयोवृद्ध मतदारांनीही मोठ्या उत्साहात मतदानाचा हक्क बजावला. शहरातील विविध केंद्रांवर सायंकाळनंतरही मतदारांच्या रांगा कायम राहिल्या.

**धक्कादायक प्रकार:महिलेच्या नावाने आधीच मतदान**

खुलताबादमध्ये गंभीर प्रकार समोर आला. निशा मंगेश खरात या महिला मतदानासाठी आल्या असता त्यांच्या नावाने आधीच कुणीतरी मतदान झाले असल्याचे उघड झाले. त्यामुळे त्यांना मतदानाचा हक्क बजावता आला नाही. या घटनेमुळे निवडणूक व्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

**दृष्टिक्षेपात खुलताबाद नगरपरिषद निवडणूक**

नगराध्यक्ष पदाचे उमेदवार : ९
नगरसेवक पदाचे उमेदवार : ७३
मतदान केंद्रे : १९
प्रभाग : १०
नगरसेवक : २०
एकूण मतदार : १४,७७५
पुरुष : ७,३५१
महिला : ७,४२४
मतदान टक्केवारी
एकूण मतदान : ८२.२६%



पुरुषांमध्ये मतदान :६,१७४
महिलांमध्ये मतदान :५,९८०
एकूण मतदान :१२,१५४ मतदार

प्रभागनिहाय मतदान पाहता,प्रभाग क्रमांक २ मधील एका केंद्रावर सर्वाधिक ८६.६९%, तर प्रभाग क्रमांक ५ मधील एका केंद्रावर सर्वात कमी ७४% मतदान नोंदले गेले.

**चोख बंदोबस्त**

उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ५ पोलीस अधिकारी, ६० पोलीस कर्मचारी, ४० होमगार्ड, १ दंगा काबू पथक असे मोठे दल तैनात करण्यात आले होते.दोन्ही आमदारांची प्रतिष्ठा पणाला या निवडणुकीत पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण,गंगापूर-खुलताबाद मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब या दोघांचीही प्रतिष्ठा पणाला लागली असल्याने स्पर्धा चुरशीची राहिली.

**मतमोजणी २१ डिसेंबरला - नागपूर खंडपीठाचा निर्णय**

नागपूर खंडपीठाने झालेल्या याचिकेनंतर खुलताबादसह विविध निवडणुकांची एकत्रित मतमोजणी २१ डिसेंबरला करण्याचा आदेश दिला. मूळ नियोजनानुसार ३ डिसेंबरला मतमोजणी होणार होती, मात्र ती स्थगित करून आता २१ तारखेला मतमोजणी होणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813